जनार्थ आदिवासी विकास संस्था

# लोकजागर

डिसेंबर २०१३ । १० डिसेंबर जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त

विकासाचे मूल्यमापन करताना नंदुरबार जिल्हा हा महाराष्ट्रामध्ये सर्वात पिछाडीला असलेला जिल्हा राहिलेला आहे. एखाद्या प्रदेशाचा विकास किती झाला हे ठरवताना त्या भागातील लोकांचे आरोग्य हाही एक महत्त्वाचा मापदंड धरला जातो. आरोग्याच्या बाबतीत नंदुरबार जिल्ह्यातील कुपोषण, बालमृत्यु, मातामृत्यु हे प्रश्न जिल्ह्याला प्रदीर्घ काळ, सातत्याने आणि तीव्रपणे भेडसावणाऱ्या समस्या ठरलेल्या आहेत. या समस्या जिल्ह्यातील सर्वच स्त्रिया आणि मुलांच्या आरोग्याशी निगडीत आहेत.

या समस्यांच्या पार्श्वभूमीवर, समाजातील प्रत्येक व्यक्तीला आरोग्याबद्दल, विशेषत: स्त्रियांच्या आणि मुलांच्या आरोग्याबद्दल, काही किमान माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे असे वाटते. म्हणून ही विविध प्रकारची माहिती सर्वांच्या पर्यंत पोचावी या उद्देशाने 'लोक जागर' हे अनियतकालिक 'जनार्थ आदिवासी विकास संस्था' प्रकाशित करत आहे. यापूर्वीही 'लोक जागर' द्वारा आरोग्य विषयक माहिती लोकांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न 'जनार्थ' ने केला आहे.

या माहितीच्या आधारे आपण वैयक्तिक पातळीवर किंवा आपल्या कुटुंबात, आपल्या गावात काय करू शकतो याचा विचार करूया आणि आपल्या जिल्ह्यातील स्त्रिया, मुले आणि सर्वच लोकांचे आरोग्य सुधारण्याच्या दिशेने पावले टाकूया.

नुकताच धो धो कोसळणारा पाऊस जाऊन हिवाळ्याची सुरुवात झाली. अवेळी पडलेल्या पावसामुळे शेतातली पिके खराब झाली. पण काही ठिकाणचा कापूस मात्र वाचला. तो आता लगबगीने काढायला हवा, त्यामुळे शेतात कापूस काढायला गेलेली मीरा शेतातलं काम संपवून घरी परत यायला निघाली.



घरी परताच घरात लग्नाविषयी बोलणी चालू असल्याचं तिच्या कानावर आलं. बोलण्यावरून तिला कळलं की ही तर तिच्याच लग्नाविषयी बोलणी चालू आहे. शेजारच्याच गावातल्या पोलीस पाटलाच्या मुलाबरोबर मीराचं लग्न करण्याची बोलणी चालू होती.








# बाल विवाह प्रतिबंध कायदा २००६

बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६नुसार विवाहासाठी मुलीचं वय १८ तर मुलाचं वय २१ वैध मानण्यात आलं आहे. तसंच बालविवाह हा दंडनीय (मर्यादितरित्या) गुन्हा मानण्यात आला आहे.

या कायद्यानुसार...

१. विवाह झालेल्या बालवधू किंवा बालवराला विवाह अवैध ठरवण्याचा अधिकार.
२. न्यायालयाचा मनाईहुकूम डावलून केलेला बालविवाह अवैध मानण्यात येईल. त्यासाठी दोन वर्षांपर्यंत कैद किंवा एक लाखांपर्यंत दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा सांगितली आहे.
३. शिक्षेत वाढ : मुलगा सज्ञान बालक (२१च्या आतील व १८च्या वर) असेल तर दोन वर्षांपर्यंत कैद किंवा एक लाखापर्यंत दंड.
४. कोणत्याही परिस्थितीत स्त्रियांना तुरुंगवासाची शिक्षा नाही.

***लग्नाच्या वेळी मुलाचे वय २१ पूर्ण व मुलीचे वय १८ पूर्ण असायला पाहिजे.***



मुलगी मोठी व्हायची वाट बघायची म्हणजे आई वडिलांना टेन्शनच की! मुलगी पळून गेली तर? आपल्याकडे अशी लहान वयात कितीतरी लग्न होतात, त्यात कुठे काय बिघडलं?



बिघडलं? अरे बालविवाह होणार आहे किंवा होतो आहे याची कोणीही तक्रार केली तरी ते लग्न थांबवलं जाऊ शकतं आणि त्यावर कायद्याने ठरवून दिलेली शिक्षा तर होणारच.

या कायद्यामुळे शिक्षा होऊ नये म्हणून मीराच्या घरच्यांनी तिचे लग्न १९व्या वर्षी लावण्याचे ठरवलं. मुलाकडच्यांना देखील तसं सांगितलं आणि ते पण तयार झाले. यासाठी दोन्ही घरच्यांना दोन वर्षे थांबावे लागणार होतं.



बघता बघता दोन वर्षे सरली आणि लग्नाची तयारी सुरू झाली. आतापर्यंत मीराला देखील पाळी, गरोदरपण, गर्भनिरोधकांचा वापर इ. विषयांची माहिती गावातील अंगणवाडी सेविका, आशा, ए.एन.एम यांच्याकडून मिळालेलीच होती. मीरा आता लग्नासाठी शरीर व मनाने तयार झाली होती. मीरा व सुनिलचं लग्न झालं आणि दोघांचा संसार सुरू झाला.

योग्य वयात लग्न झाल्यामुळं मीराचं १२ वी पर्यंतचं शिक्षण करता आलं. लग्नानंतरही तिने शिक्षण चालू ठेवायचं ठरवलं. पण तीन महिन्यातच मीरा गरोदर असल्याचं कळालं. मीरा आणि सुनिल यांचा लगेच एका वर्षात मूल जन्माला घालण्याचा इरादा नव्हता, त्यामुळे गर्भनिरोधक साधनांचा वापर ते करत होते, पण तरीही ती गरोदर राहिली. सुनिल तर नोकरीच्या शोधात होता.









## वैद्यकीय गर्भपात कायदा

वैद्यकीय गर्भपाताच्या १९७१ च्या कायद्यानुसार भारत सरकारने गर्भपात करण्याचा अधिकार स्त्रीला दिला आहे.

- या कायदयानुसार वीस आठवड्यांपर्यंत (पाच महिन्याच्या आत) गर्भपात करता येतो परंतु बारा आठवडयांपर्यत (तीन महिन्यांपर्यंत) गर्भपात करणे हे अधिक सुरक्षित असते.
- कायद्याने गर्भपात स्त्री रोगतज्ञ (बायांच्या आजाराचे डॉक्टर) आणि गर्भपाताचे प्रशिक्षण घेतलेले डॉक्टर करू शकतात.
- रजिस्टर गर्भपात केंद्र आणि जिल्हा रुग्णालयात प्रशिक्षित डॉक्टरांकडून वैद्यकीय गर्भपात करून घेण्याच्या सोई उपलब्ध असतात.
- गर्भपात कधी करता येतो:
  - बलात्कारामुळे गरोदर राहिली असेल तर..
  - कुटुंबनियोजन साधन वापरूनही गरोदर राहिली तर..
  - गरोदरपणामुळे स्त्रीच्या जीवाला धोका असेल तर..
  - अपंग किंवा मतीमंद असलेले बाळ जन्माला येणार असेल तर:
- गर्भपातासाठी परवानगी:
  - स्त्रीला स्वत:च्या इच्छेने गर्भपात करता येतो. इतर कोणाच्याही परवानगीची आवश्यकता नसते.
  - १८ वर्षाखालील आणि मानसिक आजारी असलेल्या मुलींच्या बाबतीत आई -वडिलांकडून किंवा पालकांकडून परवानगी घेतली जाते.
  - गर्भपात करण्यासाठी नवऱ्याची सही लागत नाही. तशी मागणी केल्यास डॉक्टरविरोधात तक्रार करता येते.

***** गर्भपाताबद्दल पूर्णपणे गुप्तता राखणं सर्व सरकारी आणि खाजगी दवाखान्यांची जबाबदारी आहे.*

***** गर्भपातानंतर तांबी बसवावी किंवा नसबंदी ऑपरेशन करावे अशी सक्ती डॉक्टर करू शकत नाहीत.*



- *भारतीय दंड विधान कलम ३१३ नुसार महिलेच्या संमतीशिवाय गर्भपात केल्यास जन्मठेप किंवा १० वर्षे सजा व दंड अशी शिक्षा होते.*
- *भारतीय दंड विधान कलम ३१४ नुसार महिलेच्या संमती शिवाय केलेल्या गर्भपाताच्या वेळी महिलेचा मृत्यू झाल्यास ७ वर्षे सजा किंवा जन्मठेप अशी शिक्षा होते.*

मीरा गरोदर असल्याची माहिती घरी कळाल्यावर सगळ्यांना आनंद झाला आणि या दरम्यान सुनिलला नोकरी पण लागली. त्यामुळे त्यांनी गर्भपात न करता मूल होऊन द्यायचा निर्णय घेतला. जसजसे दिवस पुढे जाऊ लागले होते तसे मीरामध्ये बदल दिसायला लागले. सासूसासरे आनंदाने ‘आम्हाला नातू पाहिजे’ असे म्हणत, तर सुनिल ‘आम्हाला मुलगीच होणार’ असे म्हणत होता. गावातल्या अंगणवाडी सेविका, आशा, ए.एन.एम. यांच्या सल्ल्याने मीराच्या गरोदरपणातील तपासण्या सुरू झाल्या.

मीराचे सासरे यांना गरोदरपणातच सोनोग्राफी करून मुलगा की मुलगी आहे कळतं याची माहिती मिळाली. हे समजण्यासाठी सुनिलने दवाखान्यात जाऊन मीराची सोनोग्राफी करावी हा अट्टाहास सुरू केला. त्यांनी एकच एक सपाटा लावल्याने हे प्रकरण नेमकं काय असतं याची माहिती विचारण्यासाठी सुनिल गावातील एका संस्थेत काम करणाऱ्या आपल्या मित्राला भेटला.









## गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्ण निदान तंत्रे (गर्भलिंग निवडीस प्रतिबंध) कायदा, १९९४, सुधारित २००३

गर्भलिंग निदानाला आळा घालण्यासाठी भारत सरकारने १९९४ साली गर्भलिंग निदान चिकित्सा (गर्भ मुलाचा की मुलीचा हे पाहणे) विरोधी कायदा आणला. त्यानंतर त्यात २००३ मध्ये काही सुधारणा करण्यात आल्या. या कायद्यानुसार गरोदरपणा आधी आणि गरोदरपणात पोटातील बाळ मुलगा की मुलगी याची तपासणी आणि निवड करून घेणं हा गुन्हा आहे.

**महत्वाच्या तरतुदी:**

- गर्भ तपासणी करण्यास स्त्रीची लेखी संमती घेणे आवश्यक आहे.
- पोटातील गर्भ /बाळ मुलगा आहे का मुलगी याची तपासणी करण्यास बंदी.
- पोटातील गर्भाचे लिंग माहीत करुन गर्भपात करण्यास बंदी.
- पोटातील गर्भाचे लिंग माहीत करून गर्भपात करुन मिळेल अशा स्वरूपाची जाहिरात करण्यास बंदी. उदा. छापील पत्रक, एस. एम. एस.
- सोनोग्राफी केली जाते ती जागा, सोनोग्राफी मशिन (तपासण्याचे मशिन) आणि मशिन वापरणारी व्यक्ती या सर्वांची नोंदणी केलेली पाहिजे.
- सोनोग्राफी मशिन, केंद्राची जागा यांची नोंदणी केलेले प्रमाणपत्र सर्वांना दिसेल अशा दर्शनी जागी लावलेले असावे.
- ज्या ठिकाणी सोनोग्राफी केली जाते त्या ठिकाणी काही गोष्टी असणे बंधनकारक आहे.
  - वेटिंग रुम/थांबण्याची जागा, ओपीडी, सोनोग्राफी मशिनच्या शेजारी ‘‘येथे पोटातील बाळाचे लिंग तपासणी केली जात नाही’’ असा बोर्ड मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषेत असायला हवा.
  - डॉक्टरांकडे या कायद्याचे पुस्तक असायला हवं.
  - सोनोग्राफी मशिन वापरण्यासंबंधीचे प्रशिक्षण झाल्याचे प्रमाणपत्र असायला हवं.
- कायदयाच्या अंमलबजावणीसाठी समिती स्थापन केली आहे. यामध्ये तीन डॉक्टर, वकील, माहिती अधिकारी आणि तीन सामाजिक कार्यकर्ते विशेषत: एक महिला संघटनेची प्रतिनिधी असावी.

**शिक्षा:**

- कायदा मोडला तर अजामीनपात्र गुन्हा ठरतो. शिवाय तडजोड न होणारा गुन्हा असल्याने डॉक्टरांना आणि संबंधित इतर व्यक्तींना शिक्षा ही होतेच.
- पहिल्या गुन्ह्यासाठी ३ वर्षांपर्यंतची कैद, रु. १०,००० पर्यंत दंड, मेडिकल कौन्सिलमधील नोंदणी रद्द.

**** कोणत्याही परिस्थितीत गर्भनिदान तपासणी करणाऱ्या गरोदर महिलेला शिक्षा होत नाही.***

**** आपल्या भागात सोनोग्राफी करुन गर्भ मुलाचा की मुलीचा आहे हे कुणीही सांगत असेल तर जिल्ह्याच्या सिव्हिल सर्जनकडे आणि शहरी भागात नगरपालिका किंवा महानगरपालिकेत वैद्यकीय अधिकाऱ्याकडे तक्रार करता येते.***



झालं! म्हणजे त्यांना हे देखील तपासता आले नाही तर.. पण त्यांना कुठे मूल पाडायचे होते?



आपण ज्या समाजात राहतो तेथे वंशाला दिवा म्हणून 'मुलगाच हवा' असा अट्टाहास आहे त्यामुळे गर्भ मुलीचा आहे हे कळाल्यावर मुलगी असलेला गर्भ पाडण्याचं प्रमाण वाढले आहेत. हे रोखण्यासाठीच हा कायदा केलेला आहे. शेवटी मुलगा असो वा मुलगी दोघांनाही जन्माला येण्याचा अधिकार आहे.

डॉक्टरांनीच 'लिंग निदान तपासणी केली जाणार नाही' असे स्पष्ट लिहूनच ठेवल्यामुळे सुनिलच्या वडिलांना आपला हट्ट सोडावा लागला.

ही बातमी सांगण्यासाठी सुनिल त्याचा जवळचा मित्र किरणच्या घरी गेला तर तो घरी नव्हता पण त्याची बायको घरी होती. सुनिलच्या लक्षात आले की ती रडत बसली होती. त्याने तिला पाहिले तर तिचा चेहरा काळानिळा आणि सुजलेला होता. सुनिलचा हा मित्र खरंतर दारु पिणारा होता. त्यामुळे त्यानेच तिला मारले असावे असा अंदाज येऊन तो तिकडनं निघाला. पण त्याला प्रश्न होता की तिला नेमकं काय झालं असावं?





तिचंच काहीतरी चुकलं असेल म्हणूनच त्यानं तिला बडवली असेल.



अरे, तू तर त्याची बाजू घेऊन बोलतोय. हो, त्यानेच तिला मारलं आहे कारण त्याने घरी पैसे द्यावेत म्हणून ती त्याच्या मागे लागली होती. असो.. भांडणाच कारण काहीही असलं तरी कोणालाही, दुसऱ्या व्यक्तीला मारण्याचा अधिकार अजिबात नाही. याबाबतीत नुकताच काही वर्षांपूर्वी कायदा झालेला आहे. यात स्त्रियांना हिंसेपासून संरक्षण देण्यात आले आहेत.

# कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा, २००५



कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांना संरक्षण देण्यासाठी हा कायदा महत्वपूर्ण आहे. या कायद्याने महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हा गुन्हा नवरा व त्याचे नातेवाईक यांच्याविरुद्ध दाखल करता येतो.

**महत्त्वाच्या तरतुदी:**

- हा कायदा दिवाणी स्वरूपाचा आहे म्हणजे हिंसाचार करणाऱ्या व्यक्तीला ताबडतोबीने शिक्षा होत नाही.
- या कायद्यामुळे एकाच छपराखाली राहणाऱ्या स्त्रियांना हिंसेपासून लगेच संरक्षण व घरात राहण्याचा अधिकार मिळतो.
- स्त्रीला केवळ सासरीच हिंसा सहन करावी लागते असे नाही तर माहेरीही असा त्रास होताना दिसतो. यामुळे अविवाहित आणि १८ वर्षाखालील मुलंही या कायद्यानुसार अर्ज करू शकतात.
- राहत्या, सासरच्या किंवा माहेरच्या घरात स्त्रियांवर, मुलांवर विविध प्रकारचे हिंसाचार होतात. कायद्यामध्ये खालील गोष्टींचा प्रामुख्याने समावेश होतो.
- मारहाण करणे, भीती घालणे, संशय घेणे.
- सक्तीने शरीर संबंध ठेवणे, अश्लील शब्दांचा वापर करणे किंवा अश्लील चित्र किंवा चित्रपट बघण्याची सक्ती करणे इत्यादी.
- टोचून बोलणे, मूल न होणे किंवा मुलगा न होण्यावरून नावं ठेवणे,
- घरातून विवाहाची सक्ती करणे, शिकण्याची आणि नोकरीची संधी नाकारणे, इत्यादी.



- हिंसा झाल्याची तक्रार स्त्रिया करू शकतात. जसे बायको, बहीण, वहिनी, आई, मुलगी, मैत्रीण, विवाह न करता एकत्र राहणाऱ्या जोडप्यातील स्त्रिया आणि १८ वर्षाखालील पीडित मुले.
- हिंसाचार किंवा छळाची तक्रार हिंसा झालेली स्त्री स्वत:, पीडित व्यक्तीचे नातेवाईक, शेजारी, हितचिंतक आणि १८ वर्षाखालील पीडित मुले करू शकतात.
- हिंसा झालेली व्यक्ती प्रत्यक्ष जाऊन तक्रार नोंदवू शकते. साध्या कागदावर तक्रार लिहून देऊन, पत्राद्वारे, फोन किंवा ईमेल पाठवून तक्रार नोंदवून मदत मागता येते.

**तक्रार कोठे नोंदवावी:**

सरकारने नेमलेले संरक्षण अधिकारी, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी, प्रांत अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, इत्यादी.

- सरकारमान्य स्वयंसेवी संस्था किंवा संघटना.
- न्यायाधीश.
- पोलीस अधिकारी, जवळचे पोलिस स्टेशन.

या कायद्याअंतर्गत अर्ज दाखल केल्यावर तीन दिवसात पहिली सुनावणी आणि संपूर्ण केसचा निकाल साठ दिवसात काढण्याचे बंधन आहे.

## आदेश:

न्यायदंडाधिकारी वेगवेगळे आदेश काढून हिंसा करणाऱ्या व्यक्तीला काही गोष्टी करण्यास मनाई करतात. विशेषत: संरक्षण आदेश हा अत्यंत महत्त्वाचा आहे.

- महिलेवर, तिच्या जवळच्या नातेवाईकांवर हिंसा न करणे, महिलेच्या कामाच्या ठिकाणी न जाणे, इ.
- राहत्या घरातून बाहेर न काढणे, हिंसा करणाऱ्या व्यक्तीला राहत्या घरातून दूर राहण्यास सांगणे, घर किंवा संपत्ती विकण्यास बंदी, इ.
- महिलेला व तिच्या मुलांना उदरनिर्वाहासाठी खर्च: जर खर्च देत नसेल तर हिंसा करणारी व्यक्ती काम करते त्या ठिकाणच्या मालकाला पगारातून ती रक्कम पुरवण्याचा आदेश दिला जाऊ शकतो.

- महिलेला, अर्जाच्या सुनावणी दरम्यान आणि पुढेही मुलांचा ताबा मिळू शकतो.
- महिलेला शारीरिक इजा झाल्यास डॉक्टरांकडील खर्च, मालमत्तेचा नाश किंवा तोडफोड केली असल्यास झालेल्या नुकसानीच्या भरपाईचा आदेश, इ.
- गंभीर हिंसा रोखण्यासाठी आणि पीडित महिलेला संरक्षण देण्याची गरज आहे असे न्यायाधीशांच्या निदर्शनास आल्यास, हिंसा करणाऱ्या व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेण्यापूर्वी न्यायाधीश आदेश देतात याला एकतर्फी किंवा त्वरित आदेश असे म्हणतात. यामध्ये आर्थिक आदेश, नुकसान भरपाई आदेश इत्यादींचा समावेश होतो.

* ***या कायद्याअंतर्गत कुटुंबात राहून पीडित महिला हिंसेविरुद्ध केस दाखल करू शकते.***
* ***इतर कोर्टात दावा चालू असला तरी या कायदयाअंतर्गत केस दाखल करता येते.***
* ***या कायदयाअंतर्गत संरक्षण अधिकारी आणि घोषित केलेल्या सेवादायी संस्था यांची भूमिका निश्चित करण्यात आली आहे.***
* ***पीडित व्यक्तीने तक्रार केली म्हणून हिंसाचार करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा होत नाही, तर कोर्टाने दिलेला आदेश पाळला नाही आणि हिंसक वर्तन चालू ठेवले म्हणून शिक्षा होते.***



- ***भारतीय दंड विधान कलम ३२३ नुसार पत्नीला मारहाण, सामान्य जखमा झाल्यास ५ वर्षे सजा व रु १०,००० पर्यंत दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा होते.***
- ***भारतीय दंड विधान कलम ३२५ नुसार पत्नीला मारहाण करून गंभीर जखमा झाल्या असल्यास ७ वर्षे सजा व दंड होतो.***

ही माहिती मिळाल्यानंतर सुनिलने त्याच्या मित्राच्या मदतीने किरणची समजूत घातली आणि त्याला या कायद्याबद्दल माहिती देऊन कडक शब्दातही समजावले.




असे स्त्रियांसाठीचे कायदे असायलाच पाहिजेत म्हणून अनेक स्त्रिया आणि स्त्री-संघटनांनी बरेच प्रयत्न केलेले आहेत. आपल्या समाजात स्त्रियांना बरोबरीची वागणूक नाहीए. उलट अनेक ठिकाणी छळ, अन्यायच होतो आहे त्यामुळे असे कायदे असणं गरजेचं आहे. तरच त्याचा वापर होऊन स्त्रियांना सन्मानाने जगता येईल.



# कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ /गैरवर्तन थांबवा



आज स्त्रिया शिक्षण घेऊन नोकरी देखील करतात पण कामाच्या ठिकाणी देखील मुलगी, बाई म्हणून त्यांच्यासोबत पुरुष सहकाऱ्यांकडून गैरवर्तन होते, लैंगिक छळ होतो. कामाच्या ठिकाणी स्त्री व पुरुष या दोघांचाही लैंगिक छळ होऊ शकतो पण छळ होणाऱ्यांच्या संख्येत जास्तीत जास्त स्त्रियाच आहेत. त्यासाठी १३ ऑगस्ट, १९९७ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळा संदर्भात काही मुद्दयांचा समावेश केला आहे.

- व्यक्तीच्या शरीराला, केसांना किंवा कपड्यांना स्पर्श करणे. जवळ खेटून उभे राहणे, कुरवाळणे, चुंबन घेणे, थोपटणे किंवा हात फिरवणे.
- दोन अर्थ असणारे शब्द बोलणे किंवा तशी भाषा वापरणे.
- लैंगिक विनोद किंवा कथा सांगणे, लैंगिक जीवनाविषयी वैयक्तिक प्रश्न विचारणे, सूचक लैंगिक शेरेबाजी करणे, परिस्थितीचा फायदा घेऊन अशा वर्तनासाठी भाग पाडणे जसं नोकरीची शाश्वती देणे, बढती देणे, इ.
- हातांनी किंवा शरीराच्या हालचालींनी लैंगिक किंवा सूचक इशारे करणे, व्यक्तीचा रस्ता अडवणे, व्यक्तिगत भेटवस्तू देणे.

***** महिला कर्मचाऱ्यांच्या संरक्षणासाठी सरकारी आणि निमसरकारी ऑफिसमध्ये महिला तक्रार निवारण समिती गठित करण्याचे बंधनकारक आहे.**

***** सरकारी, निमसरकारी, संघटित, असंघटित सर्व क्षेत्रात काम करणाऱ्या पगारी, अर्धपगारी, मानधन घेणाऱ्या किंवा स्वत:च्या इच्छेने विना वेतन काम करणाऱ्या सर्व स्त्रियांना याची मदत घेता येते.**



- ***भारतीय दंड विधान कलम २९४ नुसार महिलेकडे पाहून सार्वजनिक ठिकाणी असभ्य किंवा अश्लील हातवारे करणे, गाणी म्हणणे यासाठी असे करणाऱ्यास ३ महिन्याची सजा किंवा दंड होतो.***
- ***भारतीय दंड विधान कलम ५०९ नुसार एखाद्या महिलेचा विनयभंग करण्याच्या हेतूने तिच्याकडे पाहणे, शब्द उच्चारणे /कृती करणे यासाठी १ वर्ष सजा, दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा होते.***



बरं आता ही एवढी सगळी माहिती या निमित्ताने समजत गेली.

हं.. फक्त माहिती मिळून उपयोग नाही. त्यासाठी आपण सर्वांनी मिळून स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुदध जोमाने उभं राहायला हवं. स्त्री पुरुष समानता आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करायला हवे.



महिलांवरील हिंसा थांबविण्यासाठी गावपातळीवर निवडून आलेले प्रतिनिधी, तरुण मंडळाचे सदस्य, प्रतिष्ठित नागरिक आणि स्त्री संघटनांच्या सदस्या या सगळ्यांनी 'स्त्री हिंसाविरोधी समिती' स्थापन करून स्त्रियांवरील हिंसेला प्रतिबंध करुया. हिंसाग्रस्त महिलेला आधार देण्यासाठी महिलांचा आधारगट बनवूया. व्यक्तीवर आणि विशेषत: स्त्रियांवर होणारे अत्याचार, छळ संपून आपण सर्वांनाच हिंसामुक्त जीवन जगता आलं पाहिजे. सर्वांना समान वागणूक मिळायला हवी यासाठी आपण सगळेच प्रयत्न करुयात. ही माहिती समजून घेऊयात आणि आपला या समानतेसाठीचा वाटा म्हणून ती अनेकांपर्यंत पोहचवूयात.

**संदर्भ पुस्तिका:** १. आपले अधिकार: तथापि, २. मैत्री आरोग्याशी, तथापि-माविम, ३. कथा स्त्रीची, व्यथा गर्भपाताची: सेहत, पुणे ४. चित्रे: साथी व संकेतस्थळे

**जनार्थ आदिवासी विकास संस्था**
प्लॉट नं. ८, रमागिरी, विजयनगर, शहादा-४२५४०९, जि.-नंदुरबार
☎ ०२५६५-२२३१६५/ २२५४९५ ईमेल : janarthorg@rediffmail.com

UKaid
ऑक्सफॅम इंडिया OXFAM India